VOL- VII ISSUE- VIII AUGUST 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# समकाळाचे सांविधानिक भान असणारा लेखक : शरणकुमार लिंबाळे

**डॉ.विनोद कांबळे,**
मराठी विभाग
म.ह.शिंदे महाविद्यालय,तिसंगी ता.गगनबावडा जि.कोल्हापूर
ई.मेल-vinodspandan@gmail.com

**प्रास्ताविक :**

शरणकुमार लिंबाळे हे स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या मराठी दलित साहित्यप्रवाहातील महत्त्वाचे कवी, लेखक, आत्मकथनकार व समीक्षक म्हणून परिचित आहेत. त्यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील हन्नूर या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण हन्नूर या गावी तर माध्यमिक शिक्षण चुंगी, चपळगाव या ठिकाणी झाले. बी.ए .ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना एम. ए.चे शिक्षण घ्यायचे होते. परंतु या दरम्यानच्या काळात त्यांना अहमदपूर( जि. लातूर) येथे टेलिफोन खात्यात नोकरी मिळाल्याने त्यांचे एम.ए. चे शिक्षण त्यावेळी पूर्ण होऊ शकले नाही आकाशवाणी सोलापूर केंद्रात नोकरी करत असताना दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य बनसोडे यांच्या आग्रहाखातर त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पुढे प्राध्यापक होण्यासाठी ते 'नेट' परीक्षाही उत्तीर्ण झाले. परंतु बी .ए.ला क्लास नसल्यामुळे अधिव्याख्याता पदाच्या मुलाखतीमध्ये ते अपात्र ठरले. त्यानंतर डॉ. ल . रा .नसिराबादकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून त्यांनी 'दलित साहित्याच्या समीक्षेचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन पूर्ण करून पीएच.डी. ही पदवी प्राप्त केली. पुढे ते यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे प्राध्यापक व विविध केंद्राचे संचालक म्हणून कार्यरत राहिले.

शरणकुमार लिंबाळे यांनी विविध प्रकारात मुबलक लेखन केले आहे. त्यांच्या सर्वच कलाकृतींमधून समाजातल्या तमाम विषमतेविषयीची वास्तवदर्शी चित्रणे आलेली आहेत.आपण कार्यकर्ता लेखक असल्याचे ते मान्य करतात कारण चळवळीनेच आम्हाला लिहायला शिकवले, अस्मिता कळाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे एक नवी ऊर्जा मिळाल्याचे त्यांच्या साहित्यातून चित्रित होते. त्यामुळेच चळवळ व साहित्य ही एकमेकांना पूरक असायला हवीत ही भूमिका ते घेतात. त्यांनी विद्यार्थी दशेपासून 'दलित पंथर' या चळवळीत सहभाग घेतला. 'नामांतर ' आंदोलनात ते सक्रिय कार्यकर्ते राहिलेले आहेत. यातूनच त्यांच्या लेखनास बळ मिळाले. एकुणच त्यांचे समग्र लेखन आंबेडकरी विचार प्रेरणेतून आविष्कृत झाले आहे.

शरणकुमार लिंबाळे यांची ग्रंथसंपदा : **कवितासंग्रह** - उत्पात, श्वेतपत्रिका, धुडगूस, **कथासंग्रह** - हरिजन, रथयात्रा, उद्रेक, **कादंबरी** - उपल्या , भिन्नलिंगी , हिंदू , बहुजन, झुंड , दंगल , रामराज्य , ओ **आत्मकथन** - अक्करमाशी , बारामाशी आणि राणीमाशी **समीक्षा** - साहित्याचे निकष बदलावे लागतील ,ब्राह्मण्य ,दलित आत्मकथा एक आकलन, दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र , वादंग **संपादने** -

शतकातील दलित विचार, दलित प्रेम कविता, प्रज्ञासूर्य, गावकुसाबाहेरील कथा , रिपब्लिकन पक्ष :वास्तव आणि वाटचाल , भारतीय दलित साहित्य , विवाहबाह्य संबंध : नवीन दृष्टिकोन , साठोत्तरी मराठी वाड्मयीन प्रवाह , सांस्कृतिक संघर्ष...

दलित कवितेत एक आत्मभान आलेला कवी म्हणून लिंबाळे यांच्या कवितेकडे पहावे लागते. उत्पात या पहिल्या कवितासंग्रहात प्रामुख्याने दलितांचे दाहक जीवन, त्यांच्या जगण्यातील भीषण वास्तवता, संघर्ष यांमधून साकारू पाहणारे भविष्य, परिवर्तनवादी चळवळीना येत असलेले अपयश अशा व्यामिश्र ताणतणावाला सामोरे जाणारी कविता यामध्ये प्रस्तुत झाली आहे. श्वेतपत्रिका मधून समाजव्यवस्थेची , सामाजिक विषमतेची, दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे चित्रण केले आहे.त्यांच्या कवितेतून मनुष्यत्वाची प्रतिष्ठा जोपासणारी आंबेडकरी विचारधारा प्रस्तुत झालेली दिसते. धुडगूस हा त्यांचा अलीकडे प्रकाशित झालेला महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. समकालात समाजामध्ये बोकाळत चाललेल्या सामाजिक व राजकीय प्रश्नावरील परखड भाष्ये यामध्ये काव्यबध्द झाली आहेत.

लिंबाळे यांनी 'हरिजन ' व 'रथयात्रा'या दोन कथासंग्रहाची निर्मिती केली असून नंतर या कथासंग्रहातील काही निवडक कथांचा संग्रह 'दलित ब्राह्मण'या नावाने प्रकाशित झाला आहे. हरिजन या संग्रहात हरिजन म्हणून संबोधल्या गेलेल्या जातीचे दुःख तीव्रतेने मांडले आहे. या संग्रहातील कथा सवर्ण समाजातील लोकांनी अस्पृश्यांना दिलेल्या जीवघेण्या पशुवत अमानुष वागणुकीचे चित्रण करतात. रथयात्रा कथासंग्रहातून लिंबाळेच्या स्वतंत्र कथालेखक कौशल्याचा प्रत्यय येतो. रथयात्रा मधून दलित जीवनाचे, त्यांच्या प्रगतीचे, गुंतागुंतीचे ताण -तणाव अधिक प्रगल्भ जाणीवेने येतात. उद्रेक हा त्यांचा दलित जाणिवांची प्रभावी मांडणी करणारा कथासंग्रह आहे.

शरणकुमार लिंबाळे यांनी महत्त्वाचे कादंबरी लेखन केलेले आहे. दलित कादंबरी इतिहासात त्यांना महत्वपूर्ण स्थान आहे. भिन्नलिंगी शीर्षकाखाली दंगल व परपुरुष या वेगवेगळ्या विषयावरील दोन लघु कादंब-या आहेत. दंगल मध्ये कार्यकर्त्यांची कैफियत येते तर परपुरुष मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांची कहाणी येते . दंगल मधील बंडखोर नायक परपुरुष मध्ये मध्यमवर्गीय पांढरपेशी जीवन जगतानाचे चित्रण येते. उपल्यामधून दलित साहित्य, चळवळ, दलितांचे राजकारण यांचा परामर्श घेतला असून दलितांच्या जीवनातील व्यामिश्र ताणतणावांचे,आंतर्विरोधाचे नेमकेपणाने चित्रण येते. उपल्या या कादंबरीतून दलितांच्या राजकारणामधील कल्पित आणि वास्तव यातून दलित चळवळीची नेमकी मांडणी केलेली आहे. हिंदू मधून दलित-सवर्ण यांच्या दाहक संघर्षाचे वास्तव चित्रण केले आहे. हिंदू समाज व्यवस्थेतील विषमतेचे नेमके चित्रण यात येते. बहुजन यातून जात, धर्म आणि गुन्हेगारी यांचा राजकीय कारणासाठी वापर कसा होतोय. अशा परिस्थितीत सर्वसामान्य माणसाची होणारी परवड यातूनच माणुसकी जपणारी माणसे लोकशाही जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसतात त्याचे चित्रण येते. झुंड मधून भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असताना आजही भारतीय माणसाच्या मनातून जात ही गोष्ट हद्दपार झालेली दिसत नाही. याचे वास्तव आणि दाहक चित्रण या मध्ये केलेले जाणवते. दंगल ही कादंबरी बाबरी मस्जिदच्या निमित्ताने झालेल्या हिंदू मुस्लीम दंगलीवर आधारित आहे. रामराज्य या कादंबरीत हजारो वर्षांपासून वनवासात जगत असलेल्या दलित वर्गाचे जगणे

चितारलेले आहे. तर ओ ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. ज्या मधून समाजातील अनिष्ट प्रवृत्ती वर परखड भाष्य त्यांनी केलेले आहे. एकुणात त्यांच्या सर्वच कादंब-यातून दलितांचे शोषण ,समाजातील अनिष्ट प्रवृत्ती .दारिद्र्य ,उपासमार यांचे चित्रण येते. त्याचबरोबर कादंबरीतील नायक अनिष्ट प्रथांविरुद्ध बंड करत असल्याचेही दिसते.

'सनातन' कादंबरीत सातशे वर्षाचा पट दोनशे दहा पानांमध्ये मांडला आहे. दलितांच्या चार-पाच पिढ्यांचा संघर्ष त्यातून चित्रित झाला आहे. महार समाज आणि आदिवासी समाज यांच्यातील सामाजिक, आर्थिक स्थिती- गतीचा आलेख कादंबरीतून आला आहे. या कादंबरीतून हिंदू समाजामधील अस्पृश्यता आणि त्यामुळे निर्माण झालेले अनेक प्रश्न हाच मूळ गाभा येथे चित्रित होतो. "गोहत्या केली म्हणून ज्यांची हत्या केली त्यांना." अशा आशयाची अर्पणपत्रिका असून त्यामधून समकाळातील सामाजिक, राजकीय संदर्भ प्रस्तुत होतात. त्यामुळेच ते मनोगतामध्ये म्हणतात, "ही कादंबरी म्हणजे महारांचा इतिहास नाही; हे महारांचे वर्तमान आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे धर्मचिकित्सेला सुरुवात झाली. हिंदू धर्माने अस्पृश्यांचे आणि आदिवासींचे अतोनात नुकसान केलेले आहे, त्या नुकसानीची गणना अजून झालेली नाही; नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न तर दूरच. अस्पृश्यांच्या आणि आदिवासींच्या नुकसानीविषयी ही कादंबरी बोलते आहे."

शरणकुमार लिंबाळे यांनी आत्मकथनात्मक अक्करमाशी, बारामाशी आणि राणीमाशी अशी तीन पुस्तके लिहिलेली आहेत. म्हणजे एकाच लेखकाने तीन वेगवेगळ्या पातळीवरचे जगणे चित्रण केलेली ही दुर्मिळ घटना म्हणावी लागेल. अक्करमाशी हे त्यांचे गाजलेले आत्मकथन आहे. त्यात त्यांच्या आई जातीने महार तिचे नाव मसामय.तर बाप सवर्ण लिंगायत पाटील ,हणमंता लिंबाळे होय. आई महार व बाप लिंगायत अशा विवाहबाह्य अनैतिक संबंधातून जन्मलेल्या शरणकुमार लिंबाळे यांना आयुष्यभर 'अक्करमाशी' म्हणून स्वजातीतील महार समाज त्यांना त्यावेळेस स्वीकारण्यास तयार नव्हता तर लिंगायत सवर्ण समाज हनुमंता लिंबाळेच्या' रखेलीची पोर' म्हणून स्वीकारण्यास तयार नव्हता.अशा विचित्र अवस्थेत त्यांना सतत आपल्या अस्तित्वासाठी, हक्कासाठी जीवनात अनेक प्रकारचा संघर्ष करावा लागला आहे. याचे चित्रण अक्करमाशीत आलेले आहे. अक्करमाशी या आत्मकथनाचा जन्म एका दहक अनुभूतीतून झालेला आहे. 'मी कोण आहे...' म्हणून समाजाला विचारलेला जाब यामध्ये येतो. या आत्मकथनातून एकाच वेळी दुहेरी वेदना म्हणजे अस्पृश्यतेची आणि अक्करमाशी पणाची आलेली दिसते. बारामाशी तून मध्यमवर्गीय पांढरपेशा जीवनात प्रवेश केल्यानंतर आपले भूतपूर्व आयुष्य विसरलेल्या नायकाचे चित्रण येते. तर राणीमाशीमध्ये नायकाला सवर्ण स्त्री सुखाच्या तसेच सहवासाच्या लालसेने विक्षिप्तपणा कसा येतो याचे नेमके चित्रण येते. त्यांच्या अक्करमाशी आत्मकथनाचे अनेक भाषेत भाषांतर झालेले आहे.

लिंबाळे यांनी समीक्षा लेखनही केलेले आहे आहे त्यांच्या समीक्षा लेखना दलित साहित्याची सैद्धांतिक मांडणी आलेली आहे. दलित लेखकांनी प्रस्थापित व्यवस्थेला नकार दिला. या नकारात वाङ्मयीन मूल्येही होती. त्यांनी नवी सांविधानिक मूल्ये स्वीकारून लेखन केले. याचा शोध लिंबाळे यांनी साहित्याचे निकष बदलावे लागतील या ग्रंथात घेतला आहे.ब्राह्मण्य मध्ये ते दलितेतर लेखकांच्या साहित्याची चिकित्सा करतात. दलित आत्मकथा एक आकलन मध्ये त्यांनी ऐतिहासिक रूपात दलित

आत्मकथनांची मांडणी केली आहे.दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र या ग्रंथातून साहित्या शरणकुमार सौंदर्याविषयीची भूमिका स्पष्ट होते . या ग्रंथात त्यांनी दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र उलगडून दाखविण्याचा प्रयत्न तर केला आहेच पण स्वातंत्र्य हेच सौंदर्यमूल्य असल्याचे नमूद केले आहे .त्यांनी स्वातंत्र्य हे मूल्य कलावंताच्या संदर्भामध्ये न पारखता ते सामाजिक संदर्भात पारखलेले दिसते. वादंग या ग्रंथात विविध पुस्तकावरील समीक्षा लेख आलेले आहेत.

लिंबाळे यांनी केलेली संपादने वैविध्यपूर्ण व ऐतिहासिक स्वरूपाची आहेत. शतकातील दलित विचार यामध्ये दलित साहित्य संमेलनातील भाषणे एकत्रित केली आहेत. दलित प्रेम कविता यात दलित साहित्यातील अलक्षित मात्र वैशिष्ट्यपूर्ण कवितांचे संकलन आलेले आहे. प्रज्ञासूर्य हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा गौरव ग्रंथ आहे. गावकुसाबाहेरील कथा यात निवडक दलित कथा येतात. रिपब्लिकन पक्ष :वास्तव आणि वाटचाल हा दलित राजकीय चळवळीचे मूलगामी संपादन आहे. भारतीय दलित साहित्य या संपादकीय ग्रंथात विविध भाषांतील दलित साहित्याचा लेखाजोगा आलेला आहे. विवाहबाह्य संबंध : नवीन दृष्टिकोन हे सामाजिक समस्यांवरील महत्वाचे संपादन आहे. साठोत्तरी मराठी वाड्मयीन प्रवाह या संपादित ग्रंथत दलित, ग्रामीण, स्त्रीवादी प्रवाहाची ऐतिहासिक मांडणी वाचायला मिळते. सांस्कृतिक संघर्ष हा ग्रंथ वैचारिक स्वरूपाचा असून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अनुक्रमे जेम्स लेन, बाळ गांगल, वेदोक्त व रिडल्स प्रकरणांची परखड मांडणी करणारे लेख त्यांनी संपादित केले आहेत. हे सर्व ग्रंथ वाचकाला नवी अभ्यासदिशा देतात.

शरणकुमार लिंबाळे यांच्या साहित्यातून वास्तव अनुभव ,जीवनात आलेले वेगवेगळे प्रसंग त्यांना लिहिते करतानाचे दिसतात. कवी, कादंबरीकार, आत्मकथनकार, समीक्षक म्हणून त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन सर्वस्पर्शी आधुनिक असा आहे. त्यामुळेच ते भारतीय भाषेत पोहचलेले महत्वाचे साहित्यिक आहेत. त्यांच्या 'अक्करमाशी' या आत्मकथनाचा अनुवाद अनेक भाषेत झालेला आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या ऑक्सफर्ड पब्लिकेशन यांनी अनुवाद केला असून त्याचे नाव 'द आऊट कास्ट' असे आहे. त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक याठिकाणी विभागीय संचालक म्हणूनही काम केलेले आहे. नांदेड येथे २०१८ मध्ये झालेल्या झालेल्या १२ व्या अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.तसेच २००४ मध्ये इचलकरंजी येथे झालेल्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. त्यांना अनेक महत्वाचे पुरस्कार मिळालेले आहेत.त्यामध्ये अलिकडे २०१९ मध्ये पुणे येथे झालेल्या २० व्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनात त्यांना प्रा.रा. ग. जाधव साहित्य साधना पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

**समारोप:**

भारतीय संविधानाच्या स्वातंत्र्य, समता आणि न्याय या मूल्यावर आधारित आपल्या समग्र लेखनातून लिंबाळे मांडणी करतात. कारण 'मी लोकशाहीवादी लेखक आहे' असे ते म्हणतात.त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आपली लेखकीय भूमिका असल्याचे त्यातून नमूद होते. माणसावर होणा-या अन्याय-अत्याचार,शोषण यासारख्या गर्तेतून 'माणूसकी' हेच महत्वाचे सांविधानिक मूल्य असल्याचे त्यांच्या साहित्यातून नेमकेपणाने येते.

**संदर्भ :**

१. कृष्णा किरवले : दलित चळवळ आणि साहित्य प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९६

२. गंगाधर पानतावणे : अस्मितादर्श, विशेषांक २००७

३. रमेश धोंगडे : बावनकशी अक्करमाशी, दिलीपराज

४. लिंबाळे शरणकुमार : सनातन,दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे २०१८

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com